अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# कोटीच्या कोटी उड्डाणे आणि आठ आण्याचे रडगाणे

निवडणुकीची धामधुम सुरू झाली आहे. प्रत्येक राजकीय पक्ष आणि उमेदवार रोख रकमेचा जास्तीत जास्त कसा उपयोग करता येईल, असे डावपेच आखत आहे. आचारसंहितेचा भंग तर होणार नाही पण आपल्या निवडणुकीच्या प्रचारात रंग कायम राहील, यासाठी तो नोटांची बंडले गोळा करीत आहे. संपूर्ण निवडणुकीत किमान एक लाख कोटींचा खर्च होईल असा अंदाज व्यक्त होत आहे. म्हणजे एकीकडे कोटीच्या कोटी उड्डाणे होत असताना दुसरीकडे गरिबाच्या खिशात जेमतेम जमा होणारे आठ आणेच रद्द होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. आज बाजारामध्ये भाजीवाला रिक्षावाला, किराणा दुकानदार किंवा औषधाच्या दुकानात देखील आठ आण्याचे नाणे नाकारले जाते. बिनधास्तपणे आठ आणे रद्द झाल्याची थाप ठोकली जाते. नाईलाजाने लोकांना एक रुपया देऊन आपला पन्नास पैशांचा तोटा करून घ्यावा लागतो आहे किंवा एखादे चॉकलेट किंवा लिमलेटची गोळी खिशामध्ये घालून परतावे लागत आहे. २०११ साली चार आण्याचे नाणे इतिहासजमा झाले. आता आठ आण्याच्या मागे दुष्टचक्र सुरू झालेले दिसते. देशातल्या चलनाविषयी अधिकृत निर्णय घेण्याचे काम रिझर्व्ह बँक करत असते. आठ आण्याच्या नाण्याबाबत कोणतीही सूचना दिली गेली नसताना बाजारातले अनेक व्यापारी आठ आण्याची नाणी नाकारून आपला फायदा वाढवू पहात आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातच रुपयाची किंमत घसरली. तर भारतात आठ आण्याला कोण विचारणार हेही तितकेच खरे आहे. परंतु व्यवहारातल्या सोयीसाठी ही नाणी निर्माण केली जातात. भारत म्हणजे काही अमेरिका नाही. तिथले सगळेच व्यवहार एका डॉलरपासूनच सुरू होतात. अर्धा डॉलर, पाव डॉलर असा काही प्रकार तिथे दिसत नाही. परंतु भारत हा प्रचंड लोकसंख्येचा आणि तितक्याच विविधतेचा देश आहे. चाळीस टक्क्यापर्यंत असलेले दारिद्र्य किंवा पन्नास टक्के लोकांमध्ये असलेली गरिबी म्हणजेच पन्नास पैशांचे काय महत्त्व आहे हे सांगायला पुरेशी ठरते. रोजंदारीवर पोटभरून आठ आणे, रुपयाची छोटी-छोटी कामे करून आपले आयुष्य ढकलत नेणाऱ्यांची या देशात कमतरता नाही. निम्मी लोकसंख्या अशाच आयुष्याची वाटेकरी असताना तिच्या रोजच्या व्यवहारात महत्त्वाचे स्थान असलेले आठ आणे असे अचानकपणे रद्दबातल ठरवले जात असतील तर त्याचा फटका त्या गरिबालाच बसतो. या आठ आण्याला घालवण्यासाठी टपून बसलेले व्यापारी स्वत:चा रुपया शाबूत करत आहेत. नफेखोरी करायची आणि असेच पन्नास पन्नास पैसे जमा करुन हळूहळू तिजोरी भरायची. ही भारतातल्या व्यापाऱ्यांची जुनी प्रवृत्ती आहे. कारण ज्याप्रमाणे त्या कवडीचुंबक नाटकातला पंपुशेट एक रुपयासुध्दा 'जय जय रघुवीर समर्थ' म्हणणाऱ्या भिक्षेकऱ्याला देत नाही आणि आपल्या तिजोरीचा मोह सोडत नाही. तशाच या आधुनिक पंपु आणि गंपूशेटांनी या आठ आण्याची पाठवणी करण्याचा कट रचला असावा.

## महागाईमध्ये भर पडते

अनेक ठिकाणी हे नाणे नाकारले जात आहे. त्याची रिझर्व्ह बँकेने तातडीने दखल घेतली पाहिजे आणि ते नाकारणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला पाहिजे. चलनाचा मान न राखता स्वत:चे समांतर चलन निर्माण करून रोजच्या अर्थव्यवहारात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे असेच म्हणावे लागेल. या सगळ्या प्रकाराची रिझर्व्ह बँकेने खरे तर तातडीने दखल घेऊन तितक्याच तत्परतेने खुलासा करणे गरजेचे होते. परंतु नाण्यांपेक्षाही नोटांचे आणि मोठ्यांचे महत्त्व वाटणाऱ्या रिझर्व्ह बँकेला गरिबांच्या या नाण्याचे दु:ख काय समजणार. जिथे रोजची कमाईच तीस बत्तीस रुपयाची असते त्यातले आठ आणे कमी मिळणे हे अत्यंत वेदना देणारे असते. कारण दिवसभर राबून केलेली ही कमाई निदान त्या दिवसासाठी त्याची सोय करणारी असते. त्यातले आठ आणे किंवा रुपया कमी होणे त्याच्या दृष्टीने नुकसानकारकच ठरते. आश्चर्याचा भाग असा आहे की बाजारामध्ये अशा प्रकारचे निर्णय परस्पर कसे होतात आणि ते कालांतराने सरकारसुध्दा कसे काय स्वीकारते कारण चार आण्याच्या बाबतीतही असाच प्रकार घडला होता. सुरुवातीला बाजारामध्ये कोणीच चार आणे स्वीकारायला तयार नव्हते. मग हळू हळू लोकांनीच चार आण्याची देवाण घेवाण बंद केली. त्यानंतर रिझर्व्ह बँकेने सुचना काढून पंचवीस पैशांचे म्हणजेच चार आण्याचे नाणे निवृत्त होत असल्याची घोषणा केली तोच प्रकार आठ आण्याच्याबाबतीही सुरू झाला आहे. पुढच्या वर्षभरामध्ये रिझर्व्ह बँकच आठ आण्याला टाटा, बाय-बाय करेल. परंतु ही परिस्थिती का निर्माण होते हेच लोकांपर्यंत पोहचत नाही त्याचे गूढ मात्र कायम राहते. गेल्या पंचवीस वर्षात एक पैशापासून ते पंचवीस पैशांपर्यंतची पाच प्रकारची नाणी इतिहासजमा झाली. ती झाल्यामुळे सामान्य माणसाचे तसे नुकसानच झाले. कारण त्याला जी वस्तू चार आण्याला मिळत होती ती व्यापाऱ्यांनी चार आण्याला विकणेच बंद केले आपोआपच त्याची किंमत पंचवीस पैशांनी वाढली.

## गरिबांची कमाई वाढवा

अशा प्रकारे चलनातली नाणी रद्द करण्याचे सरकारचे नेमके धोरण काय आहे याचा खुलासा झाला पाहिजे. आता देखील आठ आणे इतिहासजमा झाले तर एक रुपयाशिवाय कोणतीच वस्तू तुम्हाला बाजारात मिळणार नाही. गरिबांसाठी अशा अनेक बारीक बारीक गोष्टी असतात की, ज्या त्याला पन्नास पैसे, रुपयामध्ये सहज घेता येत असतात. आजही गावाकडच्या आठवडे बाजारात आलंमिरची याचा वाटा पन्नास पैसे ते रुपयापर्यंत सहज मिळतो. शेतातून थेट बाजारात विक्रीसाठी आलेला हा माल छोटे छोटे वाटे करून विकणे छोट्या शेतकऱ्याला शक्यही होते. पन्नास पैशांच्या या नव्या संकटामुळे गरिबाला आणखीनच नुकसानीचा सामना करावा लागेल. एक गोष्ट मात्र खरी समाजातली पन्नास टक्के जनता गरीब आहे आणि आता रुपयातले पन्नास पैसे रद्दबातल ठरवणे याचा अर्थच पुन्हा त्या गरिबालाच रद्दबातल ठरवण्यासारखे ठरते. त्याचा विचारच करायचा नाही आणि ज्याच्याकडे बंदा रुपया असेल त्याचीच वट चालेल, असा हा सगळा श्रीमंतीकडे जाणारा आणि गरिबाला महागाईत लोटणारा प्रकार सरकारच्याच देखरेखीखाली सुरू आहे. आठ आणे इतिहासजमा जरुर करा. पण त्यासाठी गरीबाची कमाई एक रुपयाने वाढवण्याची हमी द्या. गरिबाला खिजवण्याचे काम यानिमित्ताने सुरू आहे. कोट्यवधी रुपयांची उधळण सुरू असताना त्या गोंधळात आठ आण्याचे रडगाणे कोणाला ऐकू येणार आहे.